<u>राज्य क्रीडा विकास निधीस अंशदान</u>
निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक : निविप्र २०१६ /प्र.क्र.११८ /क्रीयुसे -३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख : १६ सप्टेंबर, २०१७.

<u>वाचा:-</u>

१) शासन निर्णय समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग क्र.राक्रीधो २००२/प्र.क्र.९३/क्रीयुसे-१ दि. ३ सप्टेंबर, २००३
२) वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३,दि.१८एप्रिल,२०१७.
३) वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि.३० जून, २०१७ .
४) क्रीडा व युवक सेवा पुणे यांचे पत्र क्रमांक.राज्यक्रीविअंशदान/निधी वितरण प्रस्ताव/२०१७-१८/ का-६/४०५२ दि. ९ ऑगस्ट, २०१७.

<u>प्रस्तावना: -</u>

शासन निर्णय समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग क्र.राक्रीधो २००२/प्र.क्र.९३/क्रीयुसे-१ दि. ३ सप्टेंबर, २००३ अन्वये महाराष्ट्र राज्यात क्रीडा संस्कृतीची जोपासना व संवर्धन परिणामकारक करण्याच्या दृष्टीने राज्यात क्रीडा सुविधा विकसीत करणे, राज्यातील दर्जेदार खेळाडूंना परदेशी क्रीडा मार्गदर्शकांची सेवा उपलब्ध करुन देणे व राज्यातील आंतरराष्ट्रीय खेळाडूंना आर्थिक सहाय्य करणे, प्रशिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करणे तसेच क्रीडा विषयक उपक्रम परिणामकाक राबविणे या करिता सदर राज्य क्रीडा विकास निधी ही योजना संचालनालय स्तरावर कार्यान्वित आहे. सदर योजनेअंतर्गत सन २०१६-१७ साठी रु.११२.०० अर्थसंकल्पित निधी खर्ची पडला आहे. प्रस्तुत योजनेच्या अनुषंगाने सन २०१७-१८ मध्ये अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या रु.५०.०० लक्ष इतक्या तरतुदीपैकी वित्त विभागाच्या दि. ३० जून, २०१७ च्या शासन निर्णयानुसार ७० % च्या मर्यादेत रु.३५.०० लक्ष इतक्या निधीच्या वितरणास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

सन २०१७-१८ या वर्षाकरीता महाराष्ट्र राज्यात क्रीडा संस्कृतीची जोपासना व संवर्धन परिणामकारक करण्याच्या दृष्टीने राज्यातील आंतरराष्ट्रीय खेळाडूंना आर्थिक सहाय्य करणेसाठी रु. ५०.०० लक्ष निधी अर्थसंकल्पित आहे. त्यापैकी रु.३५.०० लक्ष तरतूद वितरीत करण्यास व सदर रक्कम आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्या अधिनस्त ठेवण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त संदर्भात होणारा खर्च "मागणी क्रमांक : ई-३, २२०४ क्रीडा व युवक सेवा-१०४, (३५)(०१) राज्य क्रीडा निधीला अंशदान (२२०४ २०८२), ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशिर्षाखालील मंजूर तरतूदीमधून भागविण्यात यावा. सदरचे अनुदान ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आले आहेत त्याच प्रयोजनासाठी खर्च करण्यात यावे.

३. वित्त विभागाच्या दि.२४/०७/२०१५ च्या शासन परिपत्रकानुसार खालील बाबी नमूद करण्यात येत आहेत.

३.१ . वित्त विभागाच्या दि.१८/०४/२०१७ च्या शासन परिपत्रकान्वये निधी वितरणाचे अधिकार विभागास आहेत.

३.२. यापूर्वी वितरीत केलेल्या अनुदानापैकी ७५% पेक्षा अधिक खर्च झाला आहे.

३.३. ज्या लेखाशिर्षाखाली अनुदान वितरीत करण्यात येत आहे त्या लेखाशिर्षातंर्गत गतवर्षापूर्वीचे संक्षिप्त देयक प्रलंबित नाही.

३.४. दि.२४/०७/२०१५ च्या आदेशातील इतर मुद्दे या आदेशास लागू नाहीत.

३.५. परिपत्रकातील “अ” व “ब” ची पूर्तता होत आहे.

४. वित्त विभागाच्या संदर्भाधिन दि. २४/०७/२०१५ व दि १८/०४/२०१७ च्या परिपत्रकातील सूचनानूसार उपरोक्त तरतूद खर्च करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. यासाठी लेखाधिकारी, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांना आंहरण व संवितरण अधिकारी तर आयुक्त क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या संदर्भाधिन दि.१८/०४/२०१७ च्या परिपत्रकातील सूचनांना अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे. सदर परिपत्रकाच्या परिशिष्टातील परिच्छेद ७ ते १८ मधील अटींची तसेच परिपत्रकाच्या परिशिष्टातील अनुक्रमांक ९ मध्ये नमूद अटींची पूर्तता होत आहे. सदर परिपत्रकाच्या परिशिष्टातील मुद्दा क्र. १,२,३,४,५,६,७ व ८ मधील बाबी सदर आदेशास लागू नाहीत.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९१६११२९१८७५२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajendra
Shankarrao
Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2017.09.16 11:19:20 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मंत्री (शालेय शिक्षण व क्रीडा)यांचे खाजगी सचिव
२. मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे.
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
५. महालेखापाल (लेखा व परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.

६. वरीष्ठ कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, पुणे.
७. वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई.
८. सर्व उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा (संचालनालयामार्फत)
९. सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी (संचालनालयामार्फत)
१०. निवडनस्ती, क्रीयुसे-३.